# शिवाजी विद्यापीठात क्रांतिवीरांना अभिवादन

**सकाळ वृत्तसेवा**

टेंबलाईवाडी, ता. ९ : ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्राणाहुती देणाऱ्या क्रांतिवीरांना आज शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या क्रांतिवन येथील हुतात्मा स्मारकास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण केले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आत्मबलिदान देणाऱ्या सर्व हुतात्म्यांप्रति कृतज्ञ भावना व्यक्त केली.

अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा...' या कवितेचे भावपूर्ण वाचन केले. विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. एस. बी. महाडिक, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.



**टेंबलाईवाडी : शिवाजी विद्यापीठातील क्रांतिवनातील हुतात्मा स्मारकास अभिवादन करताना डावीकडून डॉ. आर. व्ही. गुरव, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एस. बी. महाडिक आदी.**

# शिवाजी विद्यापाठीत क्रांतिवीरांना अभिवादन

कोल्हापूर : ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्राणाहुती देणाऱ्या क्रांतिवीरांना शिवाजी विद्यापीठात रविवारी अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या क्रांतिवन येथील हुतात्मा स्मारकास सकाळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आत्मबलिदान देणाऱ्या सर्व हुतात्म्यांप्रती आदरांजली व्यक्त करण्यात आली. अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या 'अनाम वीरा...' या कवितेचे भावपूर्ण वाचन केले. यावेळी विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. आर. व्ही. गुरव, एस. बी. महाडिक, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.